

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७४। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | सोमवार १६/११/२०२६ पाने - ६



चंदनापुरी घाटात मालट्रकचे ब्रेक फेल

अनेक वाहने एकमेकांवर आदळली, वाहतूक ठप्प



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील (एनएच-६०) चंदनापुरी घाटात शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) पहाटे ब्रेक फेल झालेल्या मालट्रकने समोरून जाणाऱ्या एसटी बसला जोरदार धडक दिल्याने पाच वाहनांचा अपघात झाला. या अपघातात एसटी बस, मालट्रक, इनोव्हा, वॅगनआर आणि महिंद्रा कंपनीच्या कारचे नुकसान झाले. मात्र, या भीषण अपघातात सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. अपघातामुळे चंदनापुरी घाटात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती.

शनिवारी पहाटे सुमारे ५ वाजून २० मिनिटांच्या सुमारास संगमनेर तालुक्यातील आनंदवाडी शिवारात, चंदनापुरी घाटातील नाशिक लेनवर हा अपघात घडला. पुण्याकडून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर उसाचा ट्रॅक्टर आणि डंपर यांच्यात यापूर्वी किरकोळ अपघात झाला होता. त्यामुळे घाटातील वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

याच दरम्यान पुण्याकडून नाशिकच्या दिशेने येणाऱ्या मालट्रक क्रमांक चक ३४ इक्स ३३८६ चे अचानक ब्रेक फेल झाले. पुढे वाहतूक कोंडीमुळे उभ्या असलेल्या एसटी बसला मालट्रकने जोरदार धडक दिली. मालट्रकच्या धडकेने एसटी बस पुढील वाहनांवर आदळली. त्यामुळे एसटी बसच्या पुढील बाजूस असलेल्या अन्य दोन वाहनांनाही धडक बसली. दरम्यान, मालट्रकने बाजूला असलेल्या इनोव्हा कारला चालकाच्या बाजूने धडक दिली. या धडकेमुळे इनोव्हा कार दोन ट्रकच्या मध्ये अडकून तिचे मोठे नुकसान झाले. या अपघातात मालट्रक, एसटी बस, इनोव्हा कार, वॅगनआर कार आणि महिंद्रा कंपनीच्या कारचे नुकसान झाले. अपघाताची तीव्रता पाहता वाहनांमधील प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, अपघातात कोणतीही व्यक्ती मृत अथवा जखमी झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अपघाताची माहिती मिळताच डोळासणे महामार्ग पोलीस केंद्र तसेच संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पहाटे ५ वाजून २५ मिनिटांनी पोलिसांना अपघाताची माहिती मिळाली आणि अवघ्या पाच मिनिटांत पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. अपघातग्रस्त वाहने टोल नाक्याच्या क्रेनच्या साहाय्याने बाजूला करण्याचे काम हाती घेण्यात आले. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले.

चंदनापुरी घाटातील अपघातामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. पहाटेच्या वेळेत झालेल्या या अपघातामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून सकाळी ९ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

या अपघातस्थळी सहायक पोलीस निरीक्षक बांबळे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक खेडकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल शेरमाळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल काकड, सदगिर आणि राहाणे यांनी भेट देऊन परिस्थिती हाताळली. घाटातील वाहतूक कोंडी आणि वाहनांच्या ब्रेकची तांत्रिक स्थिती याकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले असून, घाटातून प्रवास करताना वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवणे आणि वाहनांची नियमित तांत्रिक तपासणी करणे आवश्यक असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

कोणतीही जीवितहानी न झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

नाशिक-पुणे रेल्वेच्या निर्णयासाठी आणखी किती प्रतीक्षा ? - आ. तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाच्या भवितव्याबाबत अंतिम निर्णयाची प्रतीक्षा कायम आहे. या प्रकल्पाचा सखोल अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीला ६० दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, ही मुदत उलटून गेल्यानंतरही समितीचा अभ्यास पूर्ण झालेला नाही. असे असले तरी समितीच्या आतापर्यंत झालेल्या दोन बैठका, नियमित चर्चेची प्रक्रिया आणि तज्ज्ञ संस्थांकडून तांत्रिक सल्ला घेण्याच्या विचारामुळे या प्रक्रियेला आणखी काही काळ देण्याची तयारी आमदार सत्यजीत तांबे यांनी दर्शवली आहे. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत जनतेचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी जनसुनावणी झालीच पाहिजे, या मागणीवर ते ठाम आहेत.

नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पासाठी यापूर्वी करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान दोन प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या होत्या. समितीला ६० दिवसांपेक्षा अधिक मुदतवाढ देऊ नये आणि दुसरी म्हणजे प्रकल्पाशी संबंधित नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी जनसुनावणी आयोजित करावी. या दोन मागण्यांच्या पार्श्वभूमीवर सध्या समितीच्या कामकाजाकडे लक्ष दिले जात आहे.

६० दिवसांची मुदत ओलांडली असली तरी समितीच्या कामकाजाबाबत आमदार सत्यजीत तांबे यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. आतापर्यंत समितीच्या दोन बैठका झाल्या असून, साधारणतः दर आठ ते पंधरा दिवसांनी समितीची बैठक होत आहे. नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाचा तांत्रिकदृष्ट्या सखोल अभ्यास करण्यासाठी बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यांसारख्या नामांकित संस्थांकडून तज्ज्ञ सल्ला घेण्याचाही समिती विचार करीत आहे. ही बाब सकारात्मक असून, समिती या प्रश्नाकडे गांभीर्याने आणि सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत असेल, तर आणखी काही काळ प्रतीक्षा करण्याची आपली तयारी असल्याचे आमदार तांबे यांनी स्पष्ट केले आहे. (पान २)





संगमनेरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घातला असून, दिवसाढवळ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने ओरबाडून नेण्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील अकोले बायपास परिसरात कॉलेजला जाण्यासाठी थांबलेल्या महिला शिक्षिकेच्या गळ्यातील तब्बल ७० हजार रुपये किमतीची दीड तोळ्याची सोन्याची मिनी गंठण दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात चोरट्यांनी जबरदस्तीने ओरबाडून नेली. ही घटना शनिवारी (१४ नोव्हेंबर) सकाळी घडली. या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी अभिनवनगर परिसरातील एका बंगल्यात मोठी चोरी झाल्याचे उघडकीस आले. सलग घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे संगमनेर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर शहरातील जनतानगर, पश्चिम गल्ली क्रमांक ०३ येथे राहणाऱ्या प्रिया सुनील कुडेकर (वय ४१) या महिला शिक्षिका आहेत. शनिवारी सकाळी त्या आपल्या सहकारी शिक्षिका सुनंदा देशमुख यांच्यासोबत कॉलेजला जाण्यासाठी रघुनंदन मॉल, अकोले बायपास परिसरात थांबल्या होत्या. सकाळी सुमारे ९ वाजून १० मिनिटांच्या सुमारास त्यांच्यामागून पल्सर मोटारसायकलवरून दोन अज्ञात इसम आले. (पान २ वर)







Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 आजच संपर्क करा

24/7 Emergency Services

धनगर विद्यार्थ्यांची ६० टक्क्यांची अट घटवून ५० टक्क्यांवर, भत्त्यातही वाढ

आमदार अमोल खताळ यांच्या मागणीला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच त्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने राज्य शासनाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजने'त महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास आणि निर्वाह भत्त्यात वाढ होण्याबरोबरच शैक्षणिक पात्रतेची किमान अट ५० टक्के करण्यात आली आहे.

मुंबई येथे झालेल्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आ. अमोल खताळ यांनी स्वाधार योजनेच्या धर्तीवर धनगर तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील सर्वच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधांचा प्रश्न उपस्थित केला होता. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळत असली, तरी बारावीनंतर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना असलेली ६० टक्के गुणांची अट अनेक गरजू विद्यार्थ्यांसाठी अडथळा ठरत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे ही पात्रता अट ५० टक्के करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्वयंम योजनेतसुधारणा जाहीर केल्या आहेत. आता शहरांच्या वर्गवारीनुसार विद्यार्थ्यांना वार्षिक ५० हजार ते ८० हजार रुपयांपर्यंत भोजन, निवास व निर्वाह भत्ता मिळणार आहे. याशिवाय वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी ८ हजार रुपये, तर अन्य शाखांतील विद्यार्थ्यांना ४ हजार रुपये अतिरिक्त देण्यात येणार आहेत. या सुधारणा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू होणार आहेत. या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानतो असे आमदार खताळ पाटील यांनी सांगितले.

आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे उच्च शिक्षण अर्धवट राहू नये ही आपली भूमिका आहे. विधान सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी मांडताना पात्रतेची अट कमी करण्या बाबतची मागणी केली होती. शासनाने योजनेतील लाभ वाढवून व पात्रतेच्या निकषांत सुधारणा करून विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी अधिक सुलभ होईल.

आ. अमोल खताळ, संगमनेर

लोकसेवा फाउंडेशनचा 'वृद्धाश्रमात दिवाळी' उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, रोषणाई आणि आप्तस्वकीयांसोबत स्नेहाचे क्षण अनुभवण्याचा सण. मात्र, परिस्थितीमुळे वृद्धाश्रमात आयुष्याचा उत्तरार्ध व्यतीत करणाऱ्या अनेक ज्येष्ठ नागरिकांना या सणाचा आनंद आपल्या कुटुंबीयांसोबत घेता येत नाही. अशा आजी-आजोबांनाही दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, त्यांच्या आयुष्यात आपुलकीचे आणि मायेचे क्षण निर्माण व्हावेत, या सामाजिक भावनेतून लोकसेवा फाउंडेशनच्या वतीने राजूर-भंडारदरा रोडवरील कै. नानासाहेब देशमुख वृद्धाश्रमात 'वृद्धाश्रमात दिवाळी' हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना दिवाळीचा फराळ, विविध भेटवस्तू, दिवाळी विशेषांक तसेच वाचनासाठी पुस्तके भेट देण्यात आली. या अनोख्या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकले. दिवाळीच्या आनंदात त्यांनाही सहभागी करून घेण्याचा हा छोटासा प्रयत्न उपस्थितांसाठी समाधान आणि माणुसकीचा अनुभव देणारा ठरला.

दरवर्षी हा उपक्रम राबविण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ड. एम. एन. देशमुख साहेब तसेच राजहंस ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक नंदकिशोर बेल्हेकर सर यांचे लोकसेवा फाउंडेशनचे (पान ५)

भंडारदरा, निळवंडेतून आवर्तन सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर भंडारदरा धरणातून बिगरसिंचनाचे, तर निळवंडे धरणातून सिंचनाचे आवर्तन रविवार, दि. १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. पाण्याचा अपव्यय टाळून या आवर्तनाचे नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या त्यानुसार हे अवर्तन सुरू करण्यात आले आहे.

मागील काही दिवसांपासून भंडारदरा धरणातून पाणी सोडण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत होती. लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने . विखे पाटील यांची भेट घेऊन नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई विचारात घेऊन तातडीने आवर्तन सोडण्याची विनंती केली होती. या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांनी आज लोणी येथे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी भंडारदरा आणि निळवंडे धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यातील नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला. सद्यस्थितीत पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता तात्काळ आवर्तनाचे नियोजन करण्याचे आदेश त्यांनी दिले.

भंडारदरा धरणातून बिगरसिंचन आवर्तन रविवार, दि. १५ नोव्हेंबरपासून भंडारदरा धरणातून बिगरसिंचनासाठी पाणी सोडण्यात येणार आहे. यामुळे नदीकाठच्या गावांसह श्रीरामपूर शहराला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, इतर तालुक्यांतील पाणीपुरवठा योजनांनाही याचा लाभ होईल, असे नियोजन करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले आहेत. निळवंडे धरणातून सिंचन धरणातूनही दि. १५ नोव्हेंबरपासून सिंचनाचे आवर्तन सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या पाण्याचा लाभ डाव्या आणि उजव्या कालव्यांच्या कार्यक्षेत्रातील पिकांना होणार असून, संबंधित गावांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाईही काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे. दोन्ही धरणांतून सुटणाऱ्या या आवर्तनाचे नियोजन करताना पाण्याचा कोणताही अपव्यय होणार नाही, याची विशेष दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिले आहेत.

अमृतवाहिनी सह. बँक शेतकरी व युवकांच्या मदतीसाठी - माजी मंत्री थोरात

साकुर फाटा येथे अमृतवाहिनी बँकेच्या १४ व्या शाखेचे उद्घाटन



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकुर - इगतपुरी आणि या परिसराशी आपला जुना ऋणानुबंध आहे. एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो नागरिकांची दररोज आरोग्य सेवा केली जात असून या विभागांमध्ये ते महत्त्वाचे केंद्र झाले आहे. साकुर परिसर हा नव्याने करेक्टिव्हिटी मध्ये मुख्य केंद्र बनणार असून अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या माध्यमातून या परिसरातील शेतकरी उद्योजक व युवकांना मदतच होईल असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे नेते मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

साकुर फाटा तालुका इगतपुरी येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या १४ व्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार राजाभाऊ वाजे, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, माजी आमदार शिवराम झोले, नारायण शेठ वाजे, निवृत्ती जाधव, पांडुरंग घुले, चेअरमन सुधाकर जोशी व्हा.चेअरमन ड.नानासाहेब शिंदे, उत्तमराव सहाने, के.के.थोरात, कचरू डुकरे,उत्तमराव झनकर, नंदू गाढवे, सुनील सहाने, बाळासाहेब कुकडे, मिलिंद कुकडे,आत्माराम फोकणे, रंगनाथ भगत,माणिकराव फोकणे,मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती, दशरथ वर्पे, विष्णुपंत रहाटळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा.मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटल हे या परिसराचे मुख्य आरोग्य केंद्र बनले आहे. उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा विदर्भातून अनेक नागरिक आरोग्य सेवेसाठी या ठिकाणी येत आहेत अत्यंत चांगली सेवा या हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांना मिळत आहे. समृद्धी महामार्ग वाढवण बंदराचा महामार्ग यामुळे या विभागाची कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.

अमृतवाहिनी बँक ही सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्त्वावर काम करत असून बँकेने सर्वसामान्य नागरिक,ठेवीदार,कर्जदार यांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. चौदाव्या शाखेच्या माध्यमातून या परिसरातील शेतकरी नागरिक नवउद्योजक यांना नक्कीच मदत होईल असा विश्वास व्यक्त करताना चांगला हेतू ठेवून काम केले तर यश नक्की मिळते असे ते म्हणाले या विभागाचे आता रूप बदलले प्रत्येकाने नव्या होणाऱ्या बदलांबरोबर आपली प्रगती करावी असे आवाहन केले. तर खासदार राजाभाऊ वाजे म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या तत्त्वावरील संगमनेरचा सहकार हा देशाला दिशादर्शक आहे. एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलच्या माध्यमातून या विभागाची आरोग्याची काळजी घेण्याचे काम त्यांनी केले आहे. सध्या सहकार क्षेत्र अडचणीत आहे मात्र तरी चांगल्या नेतृत्वामुळे संगमनेरचे सहकार सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण करत आहे. या विभागात बँकेचा नक्कीच उपयोग होईल असे ते म्हणाले.

तर मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, या परिसराचा आणि संगमनेरचा जुना ऋणानुबंध आहे. एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्य सेवा जपली जात आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्य सेवेला महत्व दिले आहे. म्हणून हे लोकसेवेचे आरोग्य केंद्र ठरले आहे. खाजगी क्षेत्राकडून होणारी लूट थांबवण्यासाठी सहकार क्षेत्र काम करत असू या क्षेत्राला अधिक बळकटी द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

तर सुधाकर जोशी यांनी बँकेच्या कामकाजाची माहिती देताना डिजिटल प्रणाली, मोबाईल बँकिंग या अत्याधुनिक सुविधांसह अमृतवाहिनी बँकेने राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध पुरस्कार मिळवले असून सुमारे १२५० कोटींची उलाढाल असल्याचे सांगितले. यावेळी संचालक किसन सुपेकर, लक्ष्मण खेमनर,शिवाजी जगताप, किसनराव वाळके, अण्णासाहेब शिंदे,विवेक तांबे, राजू गुंजाळ, मोहन करंजकर यांच्यासह विविध संचालक उपस्थित होते.

परवान्याशिवाय शेतमाल खरेदी कराल तर फौजदारी कारवाई

पणन संचालनालय, बाजार समितीचा बडगा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - शेतमाल खरेदी-विक्रीच्या व्यवसायात नियमांना डावलून विनापरवाना व्यवहार करणाऱ्यांवर आता प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अधिसूचित तसेच नियममुक्त शेतीमालाची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचा किंवा पणन संचालनालयाचा अधिकृत परवाना असणे बंधनकारक आहे. अनेक व्यापारी, संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीसी) विनापरवाना थेट व्यवहार करत असल्याचा प्रकार समोर आला आहे. यापुढे कायद्याचे उल्लंघन करून विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्यांवर थेट फौजदारी आणि कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याने खळबळ उडाली आहे. शेतीमालाची कोणतीही खरेदी किंवा विक्री करण्यासाठी वैध परवाना असणे अत्यंत आवश्यक आहे. विनापरवाना व्यवसाय करणे हा पणन कायद्यानुसार कायदेशीर गुन्हा मानला जातो. सर्व व्यापारी आणि संस्थांनी हा नियम पाळणे बंधनकारक आहे. पावती देताना त्यात शेतमालाचे वजन, प्रत आणि दर यांचा स्पष्ट उल्लेख असणे गरजेचे असते. पावती न देणाऱ्या व्यापाऱ्यांवरही बाजार समितीकडून कठोर कारवाई होईल. कोणकोणत्या गोष्टी आणि ठिकाणी लागगतो परवाना?बाजार समितीच्या आवारात किंवा बाहेरही ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्राट शेतमाल खरेदी करताना परवाना लागतो. धान्यापासून इतर सर्व अधिसूचित व नियममुक्त शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी हा नियम लागू आहे. अडत दुकाने, गोदामा आणि प्रक्रिया उद्योगांनाही परवान्याची अट आहे. व्यापारी, संस्था व एफपीओवर आता बडगापरवाना न घेतांच शेतमाल खरेदी करणाऱ्या खाजगी व्यापारी आणि संस्थांवर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी (एफपीसी) सुद्धा नियमांचे पालन न केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होईल. परवाना घेण्याची प्रक्रिया आणि शुल्क किती?परवाना मिळवण्यासाठी इच्छुकांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीकडे विहित नमुन्यात अर्ज करावा लागतो. आवश्यक कागदपत्रे आणि निर्धारित शुल्क भरल्यानंतरच परवाना मंजूर केला जातो. या प्रक्रियेची सविस्तर माहिती बाजार समितीच्या कार्यालयीन वेळेत उपलब्ध होते. परवान्याचा कायद्याचा नेमका काय फायदा?परवाना पद्धतीमुळे शेतमाल खरेदी-विक्रीच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता येते. यामुळे व्यापारी व शेतकरी यांच्यातील वादाच्या प्रसंगी कायदेशीर संरक्षण मिळणे सोपे होते. तसेच शासनाकडे सर्व व्यवहारांची कायदेशीर नोंद करण्यास मदत होते.

परवान्याचे प्रकार किती?व्यवसायाचे स्वरूप आणि कार्यक्षेत्रानुसार परवान्याचे विविध प्रकार निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये व्यापारी, अडते, प्रक्रियादार आणि इतर घटकांसाठी वेगवेगळे परवाने दिले जातात. परवान्याच्या वर्गवारीनुसार संबंधित व्यवसायिकांना शुल्क व नियम लागू होतात. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि बाजार समितियांचे कामकाज नियमानुसार चालण्यासाठी परवाना घेणे बंधनकारक आहे. विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्यांवर यापुढे कठोर फौजदारी कारवाई केली जाईल.- भानुदास तिकांडे,सभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोले

कृषी उत्पन्न बाजार अधिनियम काय म्हणतो? महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या नियमांनुसार बाजार क्षेत्राबाहेर किंवा आत व्यवसाय करण्यासाठी परवाना अनिवार्य आहे. या अधिनियमनातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी हा परवाना करण्यात आला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडत्मक व कायदेशीर कारवाई केली जाते. परवानाधारक व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी केल्यावर त्यांना तात्काळ पक्की पावती देणे कायद्याने सक्तीचे आहे. अन्यथा कारवाई होणार आहे.

पान १ वरून

नाशिक-पुणे रेल्वेच्या...

समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबर रोजी बैठक झाली असून, पुढील बैठकही आठ दिवसांच्या कालावधीत घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे समितीच्या अभ्यासाला योग्य दिशा मिळून प्रकल्पाबाबत ठोस निष्कर्ष समोर येतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दुसरीकडे, आंदोलनादरम्यान करण्यात आलेल्या जनसुनावणीच्या मागणीबाबत अद्याप ठोस हालचाल दिसून आलेली नाही. डॉ. अनिल काकोडकर समितीतील सदस्य असलेले पुणे आणि नाशिकचे विभागीय आयुक्त यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोहोचून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी अपेक्षा आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकल्पामुळे ज्यांच्या जमिनी जाणार आहेत, अशा बाधित शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेणे, रेल्वे प्रकल्पाला पाठिंबा देणाऱ्या नागरिकांशी संवाद साधणे तसेच या प्रकल्पाबाबत विविध भागांतील नागरिकांच्या सूचना आणि अपेक्षा जाणून घेणे आवश्यक आहे. मात्र, या दृष्टीने अद्याप प्रत्यक्ष पातळीवर अपेक्षित हालचाल झालेली नाही. येत्या काळात जनसुनावणी आयोजित करून बाधित शेतकरी, नागरिक आणि प्रकल्पाचे समर्थक अशा सर्व घटकांना आपली भूमिका मांडण्याची संधी दिली जावी, यासाठी आमदार सत्यजीत तांबे पुढाकार घेणार आहेत. समितीच्या अध्यक्षांसह संबंधित सदस्यांपर्यंत ही मागणी पुन्हा मांडून जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्यासाठी ते पाठपुरावा करत आहेत.

पान १ वरून

संगमनेरमध्ये चोरट्यांचा...

दुचाकीवरील मागे बसलेल्या इसमाने तोंडाला रुमाल बांधलेला होता. परिसरात फारशी चाहूल न लागू देता त्याने अचानक प्रिया कुडेकर यांच्या गळ्यातील सोन्याची मिनी गंठण जोरात ओढली. दीड तोळे वजनाची आणि सुमारे ७० हजार रुपये किमतीची ही गंठण तोडून घेतल्यानंतर दोन्ही चोरटे दुचाकीवरून वेगाने पसार झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला शिक्षिका हादरून गेल्या. भरवस्तीजवळ सकाळच्या वेळेत घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी प्रिया कुडेकर यांनी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०४(१) अन्वये स्नॅचिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे करीत आहेत. आरोपींचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

अकोले बायपासवरील सोन्याची गंठण ओरबाडण्याची घटना ताजी असतानाच रविवारी (१५ नोव्हेंबर) पहाटे शहरातील अभिनवनगर परिसरात एका बंगल्यात मोठी चोरी झाल्याची घटना समोर आली. एकीकडे महिलांच्या दागिन्यांवर चोरट्यांकडून हात साफ केला जात आहे, तर दुसरीकडे घरफोडीच्या घटनाही घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

शहरात एकामागून एक चोरीच्या घटना घडत असताना चोरट्यांना पोलिसांचा धाक उरला आहे की नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सकाळच्या वर्दळीच्या वेळेत महिला शिक्षिकेच्या गळ्यातील दागिना ओरबाडून नेण्याचे धाडस आणि त्यानंतर बंगल्यात झालेली चोरी, या घटनांमुळे पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर तसेच गुन्हेगारांवरील नियंत्रणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील संवेदनशील भागांत पोलिसांची गस्त वाढवावी, दुचाकीवरून संशयास्पदरीत्या फिरणाऱ्यांवर लक्ष ठेवावे, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा तातडीने शोध घ्यावा आणि चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा चोरट्यांचे वाढते धाडस सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकते.

संगमनेर साखर कारखान्याच्या पहिल्या उचलीवर शेतकरी नेत्यांचे प्रश्नचिन्ह

३ हजार २०० रुपयांच्या दरावरून नाराजी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगामासाठी प्रतिटन ३ हजार २०० रुपयांची पहिली उचल जाहीर केली आहे. या दरावर शेतकरी नेते तथा साखर अभ्यासक ह.भ.प. डॉ. वसंतराव गुंजाळ आणि शेतकरी नेते संतोष रोहम यांनी आक्षेप घेत कारखाना व्यवस्थापनाच्या आर्थिक धोरणावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

साखरेचे बाजारभाव प्रतिक्विंटल साडेपाच हजार रुपयांच्या आसपास असल्याचा दावा करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित मोबदला मिळत नसल्याची भूमिका दोन्ही नेत्यांनी मांडली. साखरेच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न, उपपदार्थांचे अर्थकारण, उत्पादन खर्च आणि कारखान्याची आर्थिक क्षमता यांचा विचार करून उसाचा अंतिम दर निश्चित करावा, अशी मागणी त्यांनी केली.

संगमनेर येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत डॉ. वसंतराव गुंजाळ यांनी कारखान्याच्या वार्षिक अहवालातील आर्थिक आकडेवारीचा संदर्भ देत काही व्यवहारांबाबत संशय व्यक्त केला. कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.कारखाना व्यवस्थापनाने वार्षिक अहवालातील आर्थिक आकडेवारीचा स्पष्ट खुलासा करून संपूर्ण आर्थिक चित्र सभासदांसमोर मांडावे, अशी मागणी गुंजाळ आणि रोहम यांनी केली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा आणि कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राहावी, अशी भूमिका त्यांनी पत्रकार परिषदेत मांडली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दुग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

राजूरचा ऐतिहासिक बैल बाजार पुन्हा सुरू

शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार - मा. आ. वैभव पिचड

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - गेल्या वर्षभरापासून बंद असलेला राजूर (ता. अकोले) येथील पारंपरिक बैल बाजार अखेर माजी आमदार वैभव पिचड यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या बैल बाजारामुळे परिसरातील शेतकरी व व्यापाऱ्यांची होणारी पायपीट आता थांबणार असून, स्थानिक बाजारपेठेला आर्थिक बळकटी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

उद्घाटनानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना माजी आ. वैभव पिचड यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याची ग्वाही दिली. ते म्हणाले की, निवडणुका येतील आणि जातील, मात्र आपण राजकीय जोडे बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी काम केले पाहिजे. या वर्षी डांगी जनावरांचे मोठे प्रदर्शन भरविण्याचा आमचा मानस आहे. तसेच राजूरमध्ये डांगी जनावरे, धान्य आणि भाजीपाला बाजार भरवून एक उत्तम बाजारपेठ उभारली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या समस्येची गंभीर दखल घेत सचिन देशमुख यांच्या संकल्पनेतून आणि ग्रामस्थांच्या पुढाकाराने या बाजाराला पुन्हा एकदा जोरदार सुरुवात झाली आहे. या शुभारंभ प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष भानुदास तिकांडे, बाळासाहेब सावंत, माजी सरपंच गणपत देशमुख, गोकुळ कानकाटे किशोर देशमुख, यादव देशमुख, किरण कानकाटे, सयाजी अस्वले, भरत घाणे, मनोहर गवारी यांच्यासह कळवण, सिन्नर व घोटी परिसरातील शेतकरी आणि व्यापारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी सरपंच संतोष बनसोडे यांनी केले. आभार सचिन देशमुख यांनी मांडले.



कार्यक्रमास उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष भानुदास तिकांडे यांनी राजूर येथील खंडित झालेला बैल बाजार पुन्हा भरविला जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या बाजारासाठी बाजार समितीच्या वतीने सर्वोतोपरी मदत केली जाईल तसेच जनावरांसाठी पिण्याची पाण्याची व्यवस्था बाजार समितीकडून केली जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे वाजणार बिगुल

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील ५ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या राज्यांमध्ये निवडणुका होणार असून, सर्व राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगही निवडणुका घेण्याच्या दृष्टीने हालचाली करत आहे. आयोगाकडून नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात या राज्यांचा दौरा केला जाण्याची शक्यता आहे. या दौऱ्यानंतर निवडणुकीच्या तारखा जाहीर होऊ शकतात.निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत आणि निष्पक्ष पार पडावी, यासाठी निवडणूक आयोग प्रत्येक राज्यात अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहे. या बैठका साधारण २ दिवस चालण्याची शक्यता आहे. यामध्ये मतदानाची तयारी, प्रशासकीय व्यवस्था आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांचा आढावा घेतला जाईल. आयोगातील उप निवडणूक आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांनी यापूर्वीच संबंधित राज्यांना भेटी देऊन तयारीची माहिती घेतली आहे. या दौऱ्यांचे अहवाल आयोगाकडे सादर केले जात आहेत. त्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर आयुक्तांच्या दौऱ्यांचे नियोजन केले जाणार आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने संबंधित राज्यांमधील सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबतही सूचना दिल्या आहेत. एकाच जिल्ह्यात ३ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची बदली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच अधिकाऱ्यांची त्यांच्या मूळ जिल्ह्यात नियुक्ती करू नये, असेही सांगण्यात आले आहे. उत्तर प्रदेश वगळता उर्वरित ४ राज्यांमधील विधानसभांचा कार्यकाळ मार्च २०२७ पर्यंत संपणार आहे. त्यामुळे फेब्रुवारी आणि मार्चमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. तर उत्तर प्रदेश विधानसभेचा कार्यकाळ २२ मे २०२७ रोजी संपणार आहे.

श्याम जाजू लिखीत 'संघ शताब्दी निमित्ताने' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय जनता पार्टीचे पूर्व राष्ट्रीय उपाध्यक्ष व संगमनेरचे भूमिपुत्र श्याम जाजू व सहलेखक अनुपम त्रिवेदी यांनी लिहिलेले **"RSS 100"** - एक सदि संकल्पकी' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच देशाची राजधानी दिल्ली येथे उपराष्ट्रपती भवनात संपन्न झाले.

देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंगजी यांच्या अध्यक्षतेखाली, जेष्ठ पत्रकार व विचारवंत रामबहादूर राय यांच्या उपस्थितीत, दिल्ली विधानसभेचे सभापती विजेंद्र गुप्ता यांचे सानिध्यात उपराष्ट्रपती मा. सी.पी. राधाकृष्णण यांचे हस्ते हा कार्यक्रम पडला. उपराष्ट्रपती भवनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित झालेला हा पहिलाच कार्यक्रम होता. राजकीय व सामाजिक वर्तुळात सदर पुस्तक प्रकाशन हा चर्चेचा विषय बनला आहे.

इंग्रजी व हिंदीत भाषेत या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रसिद्ध लेखिका व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ. स्वाती महाळंक यांनी केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १०० (एक शतक संकल्पाचे) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पुण्यातील एस.पी. कॉलेजच्या प्रांगणात भाऊसाहेब चितळे या नवोदित वास्तूत संपन्न होत आहे. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी होणाऱ्या या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ता व चिंतक खासदार सुधांशू त्रिवेदीजी व महाराष्ट्राचे माजी मंत्री व भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ राष्ट्रीय महामंत्री खासदार श्री विनोदजी तावडे यांच्या हस्ते होणार आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात अनेक पुस्तके व साहित्य प्रकाशित झाले आहे. या पुस्तकातील अनेक घटना व प्रसंग जनतेपर्यंत पहिल्यांदाच आम्ही पोहचवत आहोत. शिवाय सर्व मजकुराचा स्तोत्र व संदर्भ हि सोबत देऊन पुस्तक परिपूर्ण स्वरुपात देण्याचा आमचा प्रयत्न आहे. असे लेखक श्याम जाजू यांनी सांगितले आहे.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात चर्चेत असणाऱ्या या पुस्तकाचे लेखक श्याम जाजू यांनी आपले वडील ज्यांच्या मुळे या विचाराशी आमचे नाते जोडले गेले ते स्वर्गीय शंकरलालजी जाजू, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसहकार्यवाहक स्वर्गीय मदनदासजी देवी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आजीवन प्रचारक राहिलेले स्वर्गीय दामू आण्णा दाते व मार्गदर्शक व प्रेरणा स्रोत स्वर्गीय यशवंत रावजी केळकर यांना संपर्पित केले आहे. पुस्तकाचे प्रकाशन दिलीपराज प्रकाशनचे श्री राजीव बर्वे यांनी केले आहे.

डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते पिंपळगाव देपा येथे विपश्यना केंद्र व बुद्ध विहाराचे भूमिपूजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आदरणीय डॉ. भीमराव आंबेडकर साहेब यांचे प्रथमच संगमनेर तालुक्यात आगमन होत आहे. त्यांच्या हस्ते मौजे पिंपळगाव देपा येथे नियोजित विपश्यना केंद्र व बुद्ध विहाराचे भूमिपूजन सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता संपन्न होणार आहे. या ऐतिहासिक व मंगल प्रसंगी संगमनेर तालुक्यातील आंबेडकरी जनता, बौद्ध उपासक-उपासिका तसेच संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा संगमनेरच्या वतीने करण्यात आले आहे.

डॉ. भीमराव आंबेडकर साहेब यांचे संगमनेर तालुक्यात प्रथमच आगमन होत असल्याने बौद्ध समाज बांधव व भगिनींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्यांच्या स्वागतासाठी तालुक्यात विविध ठिकाणी स्वागताचे नियोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. भीमराव आंबेडकर साहेब हे श्रीरामपूर येथून सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रस्थान करणार असून दुपारी १२ वाजता निमगाव जाळी येथे त्यांचे आगमन होणार आहे. येथे संगमनेर तालुका भारतीय बौद्ध महासभा व निमगाव जाळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे.

त्यानंतर आश्वी मार्गे मौजे शिबलापूर येथील शैक्षणिक संस्था व विकासकामांसाठी नियोजित जागेची ते पाहणी करणार आहेत. पुढे मौजे मालुंजे येथे बुद्ध विहाराच्या जागेचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर पिंपरणे मार्गे संगमनेर खुर्द येथे त्यांचे स्वागत करण्यात येईल. चंदनापुरी मार्गे ते पिंपळगाव देपा येथे दाखल होतील. पिंपळगाव देपा येथे नियोजित विपश्यना केंद्र व बुद्ध विहाराचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमानंतर डॉ. भीमराव आंबेडकर साहेब संगमनेर शहरातील सिद्धार्थ हायस्कूल येथे भारतीय बौद्ध महासभा, बौद्ध उपासक-उपासिका व संविधानप्रेमी नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

डॉ. भीमराव आंबेडकर साहेब यांच्या प्रथम आगमनानिमित्त संगमनेर तालुक्यातील सर्व आंबेडकरी जनता व संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांचे भव्य-दिव्य स्वागत करावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा संगमनेरच्या वतीने करण्यात आले आहे.

हे आवाहन भारतीय बौद्ध महासभा संगमनेरचे अध्यक्ष विनय घोसाळे, सेक्रेटरी सचिन साळवे, कोषाध्यक्ष दिलीप भोरुडे, संगमनेर तालुकाध्यक्ष अशोकराव गायकवाड, सेक्रेटरी राजू मंतोडे व कोषाध्यक्ष पी. एस. रोकडे यांनी केले आहे.



संगमनेरच्या सहा 'आयर्नमॅन' वीरांचा दिमाखदार सन्मान

मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांचे खेळाडूंना आवाहन – पुढील वर्षी आणखी आयर्नमॅन घडवा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दक्षिण कोरियातील 'आयर्नमॅन गुर्ये कोरिया' या आंतरराष्ट्रीय ट्रायथलॉन स्पर्धेत तब्बल २२६ किलोमीटरचे खडतर आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण करून संगमनेरचा नावलौकिक जागतिक स्तरावर उंचावणाऱ्या सहा आयर्नमॅन वीरांचा संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने दिमाखदार सोहळ्यात गौरव करण्यात आला.

आयर्नमॅन ही जगातील अत्यंत आव्हानात्मक सहनशक्तीची स्पर्धा असून यामध्ये ३.८ किलोमीटर जलतरण, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.२ किलोमीटर धावणे असे एकूण २२६ किलोमीटरचे अंतर पूर्ण करावे लागते. शारीरिक क्षमता, मानसिक कणखरता, सातत्यपूर्ण सराव आणि प्रचंड इच्छाशक्तीची कसोटी पाहणाऱ्या या स्पर्धेत करण राजपाल, आदित्य राठी, अमर नाईकवाडी, अमोद कर्पे, संजय विखे व महेश झंवर यांनी यश मिळवून संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या खेळाडूंचा मा. मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, संस्थेचे संस्थापक डॉ. सुधीर तांबे, उद्योजक राजेश मालपाणी व मा. आमदार सत्यजीतदादा तांबे यांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला.



यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करून पुढील वर्षी संगमनेरमधून आणखी जास्तीत जास्त आयर्नमॅन खेळाडू कसे तयार होतील, यासाठी आतापासूनच नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तर संस्थेचे संस्थापक डॉ. सुधीरजी तांबे यांनी खेळाडूंनी घेतलेले अपार कष्ट, जिद्द व चिकाटीचे विशेष कौतुक करून त्यांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.

आ. सत्यजीतदादा तांबे यांनीही खेळाडूंच्या यशाचे कौतुक करताना युवकांनी केवळ स्वप्ने न पाहता ती पूर्ण करण्यासाठी शिस्त, सातत्य आणि कठोर मेहनतीची जोड द्यावी, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या खेळाडूंच्या यशातून संगमनेरमधील नव्या पिढीला क्रीडा क्षेत्रात मोठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर उद्योजक राजेश मालपाणी यांनी खेळाडूंच्या असामान्य जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमांचे कौतुक करून त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशाचा गौरव करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी करण राजपाल व डॉ. संजय विखे यांनी स्पर्धेतील आव्हानात्मक प्रवास, त्यासाठी घेतलेली मेहनत आणि आलेल्या अडचणींचे अनुभव उपस्थितांसमोर कथन केले. या यशामुळे संगमनेरमधील युवकांना क्रीडा क्षेत्रात मोठी प्रेरणा मिळणार असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संस्थेचे चेअरमन राणीप्रसाद मुंदडा यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय आरोटे व डॉ. सूचित गांधी यांनी केले, तर आभारप्रदर्शन व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. नाजिमुद्दीन शेख, विलास दिघे, डॉ. माणिकराव शेवाळे, सूर्यकांत शिंदे, नानासाहेब वर्पे, श्री. दत्तात्रय आरोटे, श्रीकांत कोकणे, सुदीप वाकळे, उमेश बोटकर, डॉ. सूचित गांधी, सोमेश्वर दिवटे, ॲड. प्रशांत गुंजाळ, सौ. सुलभाताई दिघे, सौ. सुनंदाताई दिघे, अनिल सातपुते, सी. ए. अमित कलंत्री आदी मान्यवरांसह संस्थेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहा आयर्नमॅन वीरांचा गौरव करताना पुढील वर्षी आणखी खेळाडू घडविण्याचा संकल्प या सोहळ्यातून व्यक्त झाला. संग्राम पतसंस्थेचा हा उपक्रम क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणारा आणि युवकांना ध्येयपूर्तीसाठी प्रेरणा देणारा ठरला.

प्रो. फी.
दि. ७/११/२०२६
ने. ता. १७/१२/२०२६

ॲड. आर. बी. जोशी
संगमनेर कोर्ट संगमनेर
निशाणी नं.

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमनेर

चौकशी अर्ज नं. ७१८/२०२६ यांचे कोर्टात

कौशल्या रामदास गीते ---- अर्जदार
वय-७१ वर्षे, धंदा- मजूरी व घरकाम
रा. पिंप्रीलौकी अजमपुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

विरूद्ध

१) ग्रामसेवक मौजे पिंप्रीलौकी अजमपुर ---- सा. वाले
२) मा. तहसिलदार साहेब, संगमनेर

ज्या अर्थी अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०६/१९५५ रोजी मौजे पिंप्रीलौकी अजमपुर, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर येथे झालेला असुन त्याचे जन्माची नोंद सा.वाले यांच्याकडे जन्ममृत्यू रजिस्टरला आढळुन येत नसल्यामुळे सदरचा अर्ज अर्जदार यांनी जन्म मृत्यु कायदा कलम १३ (३) प्रमाणे त्याचे जन्माची नोंद सा. वाले यांचेकडे जन्म मृत्यु रजिस्टरला होणेकामी मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

सबब अर्जदार याने सदरचे चौकशी अर्जात त्याचे जन्माची नोंद सा.वाले यांच्याकडे केलेल्या मागणीसंदर्भात इतर कोणत्याही त्रयस्थ इसमाचे कुठल्याही प्रकारचे म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत अथवा मे. कोर्टाने नेमलेल्या तारखेस १७/ १२ /२०२६ या तारखेस स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे व त्यासंबधी मुळ कागदपत्रांनिशी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाच्या काही एक हरकत नाही असे समजून अर्जदाराचे मागणी प्रमाणे मे. कोर्टाचा पुढील हुकूम होईल.

आज दि. ७ / ११/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
संगमनेर

हुकूमावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, संगमनेर

प्रो. फी.
दि. ७/११/२०२६
ने. ता. १७/१२/२०२६

ॲड. बी. आर. राऊत
संगमनेर कोर्ट संगमनेर
निशाणी नं.

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमनेर

चौकशी अर्ज नं. ७२३/२०२६ यांचे कोर्टात

रूपाली भागवत जोशी ---- अर्जदार
वय-३९ वर्षे, धंदा- वकिली
रा. दाढ खु।।, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

विरूद्ध

१) ग्रामसेवक ग्रामपंचायत दाढ खु ।। ---- सा. वाला
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

ज्या अर्थी अर्जदार यांचा जन्म दि. ३०/११/१९८७ रोजी मौजे दाढ खु।।, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर येथे झालेला असुन त्याचे जन्माची नोंद सा.वाले यांच्याकडे जन्ममृत्यू रजिस्टरला आढळुन येत नसल्यामुळे सदरचा अर्ज अर्जदार यांनी जन्म मृत्यु कायदा कलम १३ (३) प्रमाणे त्याचे जन्माची नोंद सा. वाले यांचेकडे जन्म मृत्यु रजिस्टरला होणेकामी मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

सबब अर्जदार याने सदरचे चौकशी अर्जात त्याचे जन्माची नोंद सा.वाले यांच्याकडे केलेल्या मागणीसंदर्भात इतर कोणत्याही त्रयस्थ इसमाचे कुठल्याही प्रकारचे म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत अथवा मे. कोर्टाने नेमलेल्या तारखेस १७ / १२ /२०२६ या तारखेस स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे व त्यासंबधी मुळ कागदपत्रांनिशी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाच्या काही एक हरकत नाही असे समजून अर्जदाराचे मागणी प्रमाणे मे. कोर्टाचा पुढील हुकूम होईल.

आज दि. ७ /११/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
संगमनेर

हुकूमावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, संगमनेर

संपादकीय...

विकसित भारताचे स्वप्न आणि सामान्य माणसाचे वास्तव !

देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे चित्र आज सर्वत्र उभे केले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल क्रांती, वाढते महामार्ग, मोठमोठे उद्योग, अंतराळ संशोधन, जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा आणि अर्थव्यवस्थेचा विस्तार या सर्व गोष्टी निश्चितच अभिमानास्पद आहेत. २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न देशवासीयांसमोर ठेवण्यात आले आहे. मात्र, या स्वप्नांच्या झगमगाटात एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे या विकासाचा खरा लाभ सामान्य माणसापर्यंत कितपत पोहोचला आहे? कारण देशाचा विकास केवळ आकडेवारीतून नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानातील बदलातून मोजला गेला पाहिजे. आज भारत डिजिटल युगात प्रवेश करीत आहे. गावागावांत इंटरनेट पोहोचत आहे, ऑनलाइन व्यवहार वाढत आहेत, सरकारी सेवांचे डिजिटलायझेशन होत आहे. जगातील अनेक देश भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीची दखल घेत आहेत. परंतु दुसरीकडे ग्रामीण भागातील शेतकरी अजूनही विजेच्या अनियमित पुरवठ्याशी झुंज देत आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. सरकारी कार्यालयांमध्ये सामान्य नागरिकाला साध्या कामासाठीही वारंवार चकरा माराव्या लागतात. डिजिटल सुविधा निर्माण झाल्या, पण त्या वापरण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, साधने आणि सुविधा प्रत्येकापर्यंत पोहोचल्या आहेत का, याचाही विचार होणे गरजेचे आहे. महागाई हा सामान्य कुटुंबाच्या जीवनातील सर्वात मोठा प्रश्न बनला आहे. अन्नधान्य, भाजीपाला, इंधन, औषधे, शिक्षण आणि घरखर्च या प्रत्येक आघाडीवर सर्वसामान्य नागरिकाला आर्थिक गणित जुळवताना कसरत करावी लागत आहे. महिन्याच्या सुरुवातीला मिळणारा पगार महिन्याच्या अखेरीस पुरेल की नाही, याची चिंता नोकरदार वर्गाला सतावत आहे. लहान व्यावसायिकांसमोर वाढता खर्च आणि बाजारातील स्पर्धेचे आव्हान आहे. अशा परिस्थितीत विकासाचे मोठे दावे करताना सामान्य माणसाच्या खिशातील पैशाचे वास्तवही लक्षात घ्यावे लागेल. आर्थिक विकासाचा वेग वाढत असताना त्याचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समानतेने पोहोचणे आवश्यक आहे. शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मात्र, आजही शेतकऱ्याला नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाच्या अस्थिर बाजारभावाचा सामना करावा लागत आहे. आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान उपलब्ध झाले, पण ते प्रत्येक शेतकऱ्याच्या आवाक्यात आहे का? शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळतो का? सिंचनाच्या सुविधा सर्व शेतांपर्यंत पोहोचल्या आहेत का? या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळाले, तरच देशाचा विकास अधिक मजबूत होईल. बेरोजगारीचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. दरवर्षी शिक्षण पूर्ण करून लाखो तरुण रोजगाराच्या शोधात बाहेर पडतात. पदव्या हातात असूनही अनेकांना त्यांच्या पात्रतेनुसार नोकरी मिळत नाही. दुसरीकडे उद्योगांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी कमी करण्यासाठी कौशल्याधारित शिक्षण, स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन आणि नवउद्योजकांसाठी सुलभ आर्थिक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये औद्योगिक विकासाला चालना मिळाल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकते. तरुणांना रोजगारासाठी गाव सोडण्याची वेळ येऊ नये, हे विकसित भारताचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत चंदनेश्वर विद्यालयाचा डंका

सार्थक खैरेचा देशात चौथा क्रमांक



संगमनेर (प्रतिनिधी) : ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने ऊर्जा संवर्धन विषयावर आयोजित राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत चंदनेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक संतोष खैरे याने राष्ट्रीय स्तरावर चौथा क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये निसर्गसंवर्धन, नैसर्गिक ऊर्जास्रोत आणि ऊर्जा बचतीबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने दरवर्षी बालदिनानिमित्त ऊर्जा बचत व ऊर्जा संवर्धन या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा १४ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या अंतिम राष्ट्रीय स्पर्धेत इयत्ता दहावीतील सार्थक खैरे याने सहभाग नोंदविला. पात्रता परीक्षेत यश मिळवून अंतिम फेरीत पोहोचलेल्या सार्थकने राष्ट्रीय स्तरावर चौथा क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याला ७,५०० रुपयांचा धनादेश, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, भारत सरकार मा. श्री. रणजीत सिंह देओल यांच्या हस्ते तसेच ऊर्जा मंत्रालयाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.

सार्थक कला विद्यालयाचे कलाशिक्षक श्री. भागवत रावताळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य अशोक खेमनर, उपप्राचार्य के. जी. राहाणे, उपमुख्याध्यापक एस. एम. रहाणे, पर्यवेक्षिका एस. ए. कानवडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे रजिस्ट्रार एम. एम. फटांगरे, अध्यक्ष आनंदराव कढणे, उपाध्यक्ष व्ही. बी. कढणे, सचिव रामदास राहाणे, खजिनदार अशोकराव राहाणे, सदस्य अनिल कढणे व नंदू राहाणे, पंचक्रोशीतील सरपंच-उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी व सदस्य तसेच आजी-माजी विद्यार्थी संघाने सार्थकचे विशेष अभिनंदन केले.

सार्थकच्या या राष्ट्रीय यशामुळे चंदनेश्वर विद्यालयाच्या शैक्षणिक व कलात्मक गुणवत्तेचा गौरव झाला असून परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मिराबाई धात्रक यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सौ. मीराबाई शांताराम धात्रक (वय ६९ रा. सावतामाळी नगर, संगमनेर) यांचे गुरुवारी दुपारी १२ वाजता अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे, चार भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. त्यांच्यावर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. येथील व्यवसायिक संतोष व गणेश धात्रक, सौ.अनिता संतोष मूर्तडक यांच्या त्या मातोश्री होत. तर व्यवसायिक संतोष मूर्तडक, सौ. ज्योती धात्रक व प्रा. डॉ. प्रियंका धात्रक यांच्या त्या सासूबाई होत. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. मिराबाई धात्रक यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता ०२४२५-२२५१२९

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta
SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

नरवीर सिदोजी नाईक निंबाळकर यांना २२ नोव्हेंबरला अभिवादन, विश्रामगडावर भव्य सोहळ्याचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्षणासाठी मुघल सैन्याशी तीन दिवस आणि तीन रात्री निकराची झुंज देत आपल्या राजाला सुखरूप विश्रामगडावर पोहोचवणारे स्वराज्याचे पंचहजारी सरदार नरवीर सिदोजी नाईक निंबाळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.२२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अकोले तालुक्यातील विश्रामगड उर्फ पट्टा किल्ल्यावर अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



जालनापूरच्या स्वारीनंतर महाराजांचा पाठलाग करणाऱ्या प्रचंड मुघल सैन्याला रोखण्याची जबाबदारी सिदोजीरावांनी स्वीकारली. अवघ्या पाच हजारांच्या सैन्यानिशी शत्रूच्या पंचवीस तीस हजारांच्या फौजेशी त्यांनी निकराची लढाई दिली. महाराज सुखरूप गडावर पोहोचले, मात्र आपल्या राजाच्या रक्षणासाठी लढता लढता सिदोजीरावांनी आपल्या हजारो शिलेदारांसह धारातीर्थी प्राण अर्पण केले. पावनखिंडीतील बाजीप्रभूंप्रमाणेच त्यागाची आठवण करून देणारा हा पराक्रम स्वराज्याच्या इतिहासातील शौर्याचा अध्याय आहे.

शिवराष्ट्र परिवार महाराष्ट्र आणि संयुक्त वनव्यवस्थापन समिती पट्टेवाडी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांचे या गडावर आगमन झाले होते. त्यामुळे हा दिवस 'शिव पदस्पर्श दिन' म्हणूनही साजरा केला जाणार आहे. हा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर शिवइतिहासाशी नातं जोडण्याचा आणि आपल्या शूर मावळ्यांच्या धारातीर्थी त्यागापुढे नतमस्तक होण्याचा हा दिवस आहे.आज केवळ इतिहास वाचण्याची नाही, तर तो जगण्याची वेळ आलेली आहे...! आपल्या पुढच्या पिढीपर्यंत या शूरवीरांची शौर्यगाथा पोहोचवण्याची हीच खरी वेळ..!

म्हणूनच तमाम शिवप्रेमी, इतिहासप्रेमी आणि स्वराज्याच्या मावळ्यांना मनापासून आवाहन करण्यात येत आहे की येत्या २२ नोव्हेंबरला नरवीर सिदोजी रावांच्या समाधी ला विनम्र अभिवादन करण्यासाठी विश्रामगडावर बहुसंख्येने उपस्थित राहावे.. कारण गड-किल्ले म्हणजे केवळ दगड-मातीच्या वास्तू नाहीत, तर आजही आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची आणि बलिदानाची साक्ष देणारी तीर्थक्षेत्रेच आहेत. म्हणून या पवित्र धारातीर्थावर नतमस्तक होण्याचे आवाहन शिवव्याख्याते - प्रा . दिपकराव कर्पे . शिवराष्ट्रचे राज्य अध्यक्ष प्रशांतजी साळुंके , शिवराष्ट्रचे प्रदेश उपाध्यक्ष - संतोष शेळके, आधारचे व शिवराष्ट्रचे मार्गदर्शक - डॉ. महादेव आरगडे,नियोजक - सुखदेव इल्हे,युवा व्याख्याते - भूपाल शेळके . . अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर राहाणे यांनी केले आहे. या अभिवादन सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी माजी वनाधिकारी शिवाजी फटांगरे, विनोद राऊत, दत्तू इल्हे, आशितोष चांदोरे,शिवम निरगुडे (सिन्नर). लक्ष्मण कोते, डॉ. रवी साबळे, बन्सी मदने,उपवनाधिकारी अमरजीत पवार, विठ्ठल कडूस्कर, बाळासाहेब पिंगळे, सोमनाथ मदने, अनिल कडलग, पी. डी. सोनवणे, प्रा बाबासाहेब कुटे, सागर कोळगे, जयराम घुले, सतीश खताळ, प्राचार्य बाळासाहेब आहेर, कैलास कानवडे आदींसह संगमनेर, अकोले व सिन्नर तालुक्यातील अनेक शिवभक्त प्रयत्नशील आहेत.

संगमनेरमध्ये मौलाना आझाद यांना अभिवादन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयात ११ नोव्हेंबर रोजी स्वातंत्र्यलढ्यातील महान नेते आणि देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सह्याद्री शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. बाबा खरात होते. आपल्या भाषणात त्यांनी मौलाना आझाद यांच्या महान कार्याचा आणि देशासाठी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. यावेळी जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष इद्रीस शेख यांनी मौलाना आझाद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाला संगमनेर साहित्यिक मंडळाचे अध्यक्ष अरविंद गाडेकर, सचिव ज्ञानेश्वर राक्षे, जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे उपाध्यक्ष सय्यद आसिफ अली, अन्सार सय्यद, बिंदू जाँगिरदार तसेच कार्यालयातील अधिकारी हांडे, अरगडे आदींसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक
दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२ mahapwd.gov.in/https://pay to pwd
निविदा सुचना क्रमांक /२४/ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता सा.बां. विद्युत विभाग नाशिक दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२ हे खालील संकेतस्थळावर नमूद केलेल्या ब-१ नमुन्यातील निविदा गेट वे पेमेंट निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विदयुत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन निविदा मागवित आहेत.

वरील निविदेत 94 कामे समाविष्ट असून या निविदेवरील संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे.

www.mahapwd.gov.in
hups://paytopwd.com

या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी नोंद घ्यावी

जा.क्र. काअना/निविदा-2/1823 । सन 2026.
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विद्युत विभाग, ग्रीन बिल्डींग,
2 रा मजला, उंटवाडी रोड, सा.बां. परिसर,
नाशिक.
E-mail-elnashik.ee@mahapwd.gov.in
दिनांक :- 5/11/2026

कार्यकारी अभियंता,
सा.बां. विद्युत विभाग, नाशिक.

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर- ०१
कॉम्प्युटर ऑपरेटर- ०१
पत्ता- श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष - ४ जागा
महिला - २ जागा
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
गरजू व अनुभवी
साईट इंजिनीअर,
सुपरवायझर व
ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट,
माळीवाडा, ता. संगमनेर
संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.
संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- बिझनेस एक्झिक्युटिव्ह - ४
- कार्यालयीन प्रशासक - १
- आयटी प्रोफेशनल - १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१
कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
(टॅली ज्ञान अवश्यक)
जागा -१
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

धगधगते हिमशिखर हे पुस्तक संघर्षाचा प्रेरणादायी इतिहास - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्याला सुसंस्कृत नेतृत्वाची मोठी परंपरा लाभली आहे. के बी दादा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला सामाजिक समता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला. त्याकाळची परिस्थिती वर्णन आणि त्यांचे जीवन चरित्र हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या जीवनावरील धगधगते हिमशिखर हे पुस्तक संघर्षाचा इतिहास असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षण व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

ढोले लॉन्स येथे के.बी दादा देशमुख यांच्या जीवनावर आधारित डॉ. संतोष खेडलेकर लिखित धगधगते हिमशिखर या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर डॉ संजय मालपाणी, मा आ डॉसुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, निर्मल कुमार देशमुख, सौ अपर्णाताई देशमुख, अनिलराव देशमुख, रामहरी कातोरे, सुधाकर जोशी ,नानासाहेब शिंदे ,बाळासाहेब देशमाने, सौ.अर्चना मुंडे,सौ आरती आरोटे, हिरालाल पगडाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, के बी दादा देशमुख यांचा जीवन प्रवास हा संघर्षाचा राहिला आहे. शिक्षणाप्रती त्यांचे मोठे प्रेम होते शिक्षणासाठी घरातून पळून जाऊन त्यांनी संगमनेरला येऊन शिक्षण घेतले. सामाजिक समता निर्माण करण्याचे धाडस त्यांनी केले. लहानपणी वकील होण्याची स्वप्न पाहिले आणि त्या ध्येयातून ते बहुजन समाजातील पहिले वकील झाले. आमदारकी नंतर शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात त्यांनी मांडले. इतिहास लेखन अवघड काम आहे. विविध घटना व पुस्तकांचा अभ्यास, व्यक्तिमत्वाचा अभ्यास ,प्रवास वर्णन, शोध आणि प्रामाणिकपणा जपत काम करावे लागते .विविध व्यक्तींच्या जीवन प्रवास तपासून त्याची योग्य मांडणी करण्याचे काम डॉ. संतोष खेडलेकर यांनी केले आहे.

तर डॉ.संजय मालपाणी म्हणाले की, के बी दादा देशमुख यांना शिक्षणाविषयी मोठी आत्मीयता होती.जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शिक्षणातून जाती भेदाच्या भिंती नाहीशा करण्याचे काम त्यांनी केले. सुरुवातीच्या काळात न्यायालयाजवळ ते राहायचे खेडेगावातून कोणी आले तर जेवणासाठी त्यांच्याकडे यायचे. मानवतेचा मंत्र त्यांनी समाजाला दिला. मित्र आणि शत्रू त्यांना कायम सम वाटला असे सांगताना सध्या मैदानी खेळ कमी झाले आहेत .हे अत्यंत दुःखदायी असून यामुळे आजार वाढले आहे. त्यामुळे मुलांनी मैदानावर जास्त वेळ खेळले पाहिजे. याकरता पालकांनीही आग्रह करावा असे सांगताना के बी दादांच्या विविध आठवणी त्यांनी जागवल्या.

तर मा आमदार डॉ तांबे म्हणाले की, के बी दादा हे समाज परिवर्तनातील मोठे व्यक्तिमत्व होते सामाजिक कामात त्यांनी कायम पुढाकार घेतला. त्यांच्या जीवन कार्याचा आदर्श घेऊन चांगली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपल्या सर्वांना काम करावा लागणार आहे.

यावेळी लेखक डॉ. संतोष खेडलेकर यांनी पुस्तकाविषयीचे मनोगत व्यक्त केले

आदिवासी बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आठ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन - आ. डॉ. किरण लहामटे



क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राजूर आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या वतीने ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान 'जनजातीय गौरव सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासह शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती आमदार डॉ. किरण लहामटे यांनी दिली.

राजूर येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांच्यासह प्रकल्प कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांनी जल, जंगल आणि जमिनीवरील आदिवासी समाजाच्या अधिकारांसाठी संघर्ष केला. अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी स्वाभिमान, स्वातंत्र्य, सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रभक्तीचा विचार समाजासमोर ठेवला. त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजातीय गौरव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारने २०२१ पासून १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या सप्ताहांतर्गत १३ नोव्हेंबर रोजी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान आणि प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात येणार आहेत. महिला बचत गटांना आर्थिक स्वावलंबन, स्वयंरोजगार आणि कृषिपूरक व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

१४ नोव्हेंबर रोजी देवगाव येथील आदिवासी स्मारकाची स्वच्छता करून दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचा मुख्य शासकीय सोहळा होणार असून, पुष्पांजली अर्पण करून विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तसेच शासकीय आश्रमशाळा केळी, रुमणवाडी आणि अकोले येथील शैक्षणिक सुविधांशी संबंधित इमारतींचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

१६ नोव्हेंबर रोजी वनपट्टेधारकांना शासकीय योजनांचे लाभ, आधारकार्ड अद्ययावतीकरण, शेतकरी नोंदणी, पीकविमा आणि ऑनलाइन शासकीय सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. १७ नोव्हेंबर रोजी विविध ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे, माता-बाल आरोग्य आणि पोषणविषयक जनजागृती केली जाणार आहे. तर १८ नोव्हेंबर रोजी महिला बचत गटांचे मेळावे, युवक-युवतींसाठी कौशल्य विकास, रोजगार, अप्रेंटिसशिप आणि स्वयंरोजगार योजनांबाबत मार्गदर्शन करून सप्ताहाचा समारोप होणार आहे.

या सप्ताहाच्या माध्यमातून जास्तीत जास्त आदिवासी बांधवांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राजूर आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत विविध विभागांच्या समन्वयातून हे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी दिली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजूर आदिवासी प्रकल्प कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी नियोजनबद्ध पद्धतीने काम करीत असून, आदिवासी समाजातील नागरिकांनी या सप्ताहात आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा,

माझी स्टाईल वापरल्यास खबरदार - रूपाली चाकणकरांचा इशारा

राष्ट्रवादीच्या नेत्या, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माझे नाव, माझा फोटो, माझी ओळख, माझी वैयक्तिक शैली आणि स्वतःला सादर करण्याची माझी विशिष्ट पद्धत यासंदर्भात ट्रेडमार्क नोंदणी करण्यात आलेली आहे, असं जाहीर केले होते. महाराष्ट्राची एपस्टीन फाइल्स' या चित्रपटात अभिनेत्री दिपाली सय्यद या रुपाली चाकणकर यांची भूमिका साकारत असल्याचं बोललं जात आहे. यानंतर रुपाली चाकणकर यांनी व्यावसायिक कारणासाठी कोणत्याही प्रकारचे फोटो,व्हिडिओ, फिल्म, रील, टीझर, प्रमोशनासाठी माझी स्टाईल वापरल्यास कायदेशीर कारवाई होईल असं त्यांनी म्हटलं होते. यावरुन आता अभिनेत्री दिपाली सय्यद यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. आ बैल मुझे मार.. अशी चाकणकरांची अवस्था झाली आहे. तुमच्या घरी आई बहिण सगळेच साड्या नेसतात. क्लिप लावतात. अशी किती तरी लोकं आहेत ज्यांच नाव रुपाली आहे. हे किती हास्यास्पद आहे. रुपाली चाकणकर यांना कोण कायदेशीर सल्ला देत आहे? अजून त्यांनी केलेल्या ट्रेडमार्कला परवानगी मिळालेली नाही. या गोष्टींना न घाबरता हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. असं करुन ती व्यक्ती



मीच आहे हे तुम्ही सिद्ध करत आहात, असं अभिनेत्री दिपाली सय्यद यांनी म्हटलं आहे. मी कलाकार आहे, कोणतीही व्यक्तिरेखा साकारली आहे, ती लोकांना आवडते म्हणून ते स्विकारली आहे. ती मीच आहे हे तुम्ही बोंबाबोंब करुन सांगत आहात. हे सर्व कोर्टात चालू आहे. त्यांनी आत्ता पाच नोव्हेंबरला हे ट्रेडमार्कसाठी अर्ज टाकला आहे, त्यालाअजून मान्यताही मिळाली नाही.आम्हीही कायदेशीर उत्तर देत आहोत असंही दिपाली सय्यद यांनी स्पष्ट केले आहे.

माझ्या पूर्वपरवानगीशिवाय कोणीही माझे नाव, फोटो, ओळख किंवा माझ्या विशिष्ट शैलीचा स्वतःच्या फायद्यासाठी कोणत्याही प्रकारचे फोटो, व्हिडिओ, फिल्म, रील, टीझर, प्रमोशन किंवा इतर कोणतेही साहित्य तयार करण्यासाठी, वापरण्यासाठी किंवा प्रसिद्ध करण्यासाठी वापर केल्यास अशा व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल..

पान १ वरून लोकसेवा फाउंडेशनचा...

अध्यक्ष प्रथमेश बेल्हेकर यांनी आभार मानले. समाजातील गरजू आणि वंचित घटकांसोबत सण-उत्सव साजरे करण्याच्या उद्देशाने फाउंडेशन सातत्याने हा सामाजिक उपक्रम राबवत असून यंदाचे हे ७वे वर्ष असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रसंगी श्रेयस करपे, संकेत घोडेकर आणि संभव लोढा उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विवेक कोथमिरे, प्रीतेश नवले, अनिल केदारी, संकेत काकडे, दर्शन गायकवाड, ब्रह्मा खिडके आणि अक्षय नेवासकर यांनी विशेष योगदान दिले. तसेच दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, ज्येष्ठ पत्रकार संतोष खेडलेकर, दै.दिव्य मराठीचे गौतम गायकवाड आणि दै.लोकमतचे शेखर पानसरे यांनी दिवाळी अंक व पुस्तके भेट दिली. नगरसेवक सोमेश्वर दिवटे, गौरव डोंगरे आणि विकीशेठ वर्मा व तुषार भगत यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी भेटवस्तू देण्यात आल्या.

दिनविशेष

२०००: — कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे दिला जाणारा संस्कृत रचना पुरस्कार डॉ. गजानन बाळकृष्ण पळसुले यांना जाहीर.

१९९७: — अनिवासी भारतीय उद्योजक स्वराज पॉल यांना ब्रिटनमधील ब्रॅडफोर्ड विद्यापीठाकडून सन्माननीय डॉक्टरेट प्रदान.

१९९६: — कोकण रेल्वेच्या रत्नागिरी - मुंबई मार्गाचा शुभारंभ.

१९८८: — अकरा वर्षांनंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुका जिंकुन बेनझीर भुट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान बनल्या.

१९४५: युनेस्को (UNESCO) — स्थापना.

१९३०: — स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरीत स्पृश्यास्पृश्यांचे पहिले प्रकट सहभोजन

१९१५: — लाहोर कटातील आरोपी विष्णू गणेश पिंगळे, बागी कर्तार सिंग यांच्यासह ७ जणांना फाशी देण्यात आली.

१९१४: — अमेरिकेतील मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह सुरू झाली.

जन्म

१९७३: पुल्लेला गोपीचंद — भारतीय बॅडमिंटनपटू — पद्म भूषण, पद्मश्री, मेजर ध्यान चंद खेलरत्न

१९६८: शोभाजी रेगी — भारतीय राजकारणी (निधन: २४ एप्रिल २०१४)

१९६३: मिनाक्षी शेषाद्री — अभिनेत्री

१९५३: कोडियेरी बालकृष्णन — भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (निधन: १ ऑक्टोबर २०२२)

१९३०: मिहिर सेन — एका वर्षात पाच खंडातील महासागर पोहणारे एकमेव व्यक्ती — पद्म भूषण, पद्मश्री (निधन: ११ जून १९९७)

१९२७: श्रीराम लागू — भारतीय मराठी अभिनेते — पद्मश्री (निधन: १७ डिसेंबर २०१९)

१९१७: चित्रगुप्त — संगीतकार (निधन: १४ जानेवारी १९९१)

१९०९: मिर्झा नासीर अहमद — भारतीय-पाकिस्तानी धर्मगुरु (निधन: ९ जून १९८२)

१९०४: ननामदी अझीकीवे — नायजेरिया देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: ११ मे १९९६)

मृत्यू

२००६: मिल्टन फ्रिडमन — अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ — नोबेल पारितोषिक (जन्म: ३१ जुलै १९१२)

१९६७: रोशन — संगीतकार (जन्म: १४ जुलै १९१७)

१९६०: क्लार्क गेबल — अमेरिकन अभिनेते (जन्म: १ फेब्रुवारी १९०१)

१९५६: ओटोरी तानिगोरो — जपानी २४वे योकोझुना सुमो पैलवान (जन्म: ३ एप्रिल १८८७)

१९५०: बॉब स्मिथ — अमेरिकन फिजिशियन आणि सर्जन, अल्कोहोलिक एनोनिमसचे सह-संस्थापक (जन्म: ८ ऑगस्ट १८७९)

१९५०: डॉ. बॉब स्मिथ — अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस संस्थेचे सहसंस्थापक (जन्म: ८ ऑगस्ट १८७९)

१९४७: ज्युसेप्पे वोल्पी — व्हेनिस फिल्म फेस्टिवलचे संस्थापक (जन्म: १९ नोव्हेंबर १८७७)

१९१५: विष्णू गणेश पिंगळे — गदर पार्टीचे सदस्य आणि लाहोर कटातील क्रांतिकारक



दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

१६ नोव्हेंबर

१६ नोव्हेंबर १९४५ : युनेस्कोची स्थापना

युनेस्को (UNESCO) ही संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शांतता, बंधुभाव आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात आली. १६ नोव्हेंबर १९४५ रोजी लंडन येथे झालेल्या परिषदेत ३७ देशांनी युनेस्कोच्या संविधानावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर ४ नोव्हेंबर १९४६ रोजी हे संविधान लागू झाले आणि युनेस्कोने अधिकृतपणे कार्य सुरू केले.युनेस्कोचे पूर्ण नाव 'युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन' (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) असे आहे. या संघटनेचे मुख्यालय फ्रान्समधील पॅरिस येथे आहे. जगातील विविध देशांमध्ये शिक्षण, विज्ञान, संस्कृती आणि माहितीच्या क्षेत्रात सहकार्य वाढविणे हे युनेस्कोचे प्रमुख उद्दिष्ट आहे.युनेस्को शिक्षणाच्या प्रसारासाठी विशेष प्रयत्न करते. जगातील प्रत्येक व्यक्तीला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, निरक्षरता कमी व्हावी आणि शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ही संघटना विविध कार्यक्रम राबवते. गरीब आणि विकसनशील देशांमधील शैक्षणिक विकासासाठी मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाते.विज्ञानाच्या क्षेत्रातही युनेस्को महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देणे, पर्यावरणाचे संरक्षण, जलसंपत्तीचे व्यवस्थापन, जैवविविधतेचे संवर्धन आणि विज्ञानाचा उपयोग मानवकल्याणासाठी करणे यासाठी संघटना प्रयत्नशील असते. हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण यांसारख्या जागतिक समस्यांवर विविध देशांमध्ये सहकार्य घडवून आणले जाते.युनेस्कोचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे जगातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे. ऐतिहासिक वास्तू, प्राचीन मंदिरे, लेणी, किल्ले, स्मारके आणि नैसर्गिक स्थळांचे संरक्षण करण्यासाठी ही संघटना काम करते. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारतातील ताजमहाल, अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, कुतुबमिनार आणि इतर अनेक ऐतिहासिक स्थळांचा समावेश आहे. या स्थळांना जागतिक स्तरावर विशेष ओळख मिळाली आहे.भारत हा युनेस्कोच्या संस्थापक सदस्य देशांपैकी एक आहे. भारतीय संस्कृती, परंपरा, कला, साहित्य, संगीत आणि योग यांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यात युनेस्कोचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतातील अमूर्त सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठीही ही संघटना कार्य करते.युनेस्कोचा मुख्य उद्देश जगातील विविध देशांमध्ये शांतता आणि परस्पर समज वाढविणे हा आहे. शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून मानवतेचा विकास साधण्याचा या संघटनेचा प्रयत्न आहे.

पुलेला गोपीचंद - भारतीय बॅडमिंटनपटू आणि यशस्वी प्रशिक्षक

जन्मदिन विशेष

पुलेला गोपीचंद हे भारतातील एक प्रसिद्ध माजी बॅडमिंटनपटू आणि यशस्वी प्रशिक्षक आहेत. भारतीय बॅडमिंटनला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९७३ रोजी आंध्र प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्यातील नागंडला येथे झाला. त्यांचे वडील पुलेला सुभाषचंद्र बोस आणि आई पुलेला सुब्बारावम्मा आहेत. लहानपणी त्यांना क्रिकेटची आवड होती; मात्र त्यांचे मोठे भाऊ राजशेखर यांनी त्यांना बॅडमिंटन खेळण्यासाठी प्रोत्साहित केले. वयाच्या तेराव्या वर्षापासून त्यांनी बॅडमिंटनमध्ये आपली चमक दाखवण्यास सुरुवात केली.गोपीचंद यांनी हैदराबाद येथील सेंट पॉल हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण घेतले. त्यानंतर ए.व्ही. महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. खेळातील सातत्य, कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण केले. १९९१ मध्ये त्यांची भारतीय बॅडमिंटन संघात निवड झाली. त्यानंतर त्यांनी अनेक राष्ट्रीय



आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.१९९६ मध्ये त्यांनी प्रथमच राष्ट्रीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. विशेष म्हणजे १९९६ ते २००० या सलग पाच वर्षांत त्यांनी राष्ट्रीय विजेतेपद कायम राखले. १९९८ मध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत त्यांनी दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक मिळवले. त्याच वर्षी राष्ट्रकुल स्पर्धेतही त्यांनी सांघिक प्रकारात रौप्य आणि पुरुष एकेरीत कांस्यपदक जिंकले. १९९९ मध्ये त्यांनी स्कॉटिश ओपन आणि टुलूज ओपन यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवून भारताचा नावलौकिक वाढवला.त्यांच्या क्रीडा कारकिर्दीतील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००१ मधील ऑल इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत त्यांनी तत्कालीन जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू पीटर गाडे यांचा पराभव केला. अंतिम सामन्यात चीनच्या चेंग होंग याला पराभूत करून त्यांनी ऐतिहासिक विजय मिळवला. प्रकाश पदुकोण यांच्यानंतर ऑल इंग्लंड स्पर्धेचे विजेतेपद मिळवणारे ते दुसरे भारतीय ठरले. या विजयामुळे भारतीय बॅडमिंटनला जागतिक स्तरावर मोठी प्रतिष्ठा मिळाली.खेळाडू म्हणून कारकीर्द घडवल्यानंतर गोपीचंद यांनी प्रशिक्षक म्हणून भारतीय बॅडमिंटनच्या विकासासाठी काम सुरू केले. २००८ मध्ये त्यांनी हैदराबाद येथे पुलेला गोपीचंद बॅडमिंटन अकादमीची स्थापना केली. या अकादमीच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रतिभावान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी मार्गदर्शन केले. सायना नेहवाल, पी. व्ही. सिंधू, किदांबी श्रीकांत आणि पारुपल्ली कश्यप यांसारख्या खेळाडूंच्या कारकिर्दीला आकार देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बॅडमिंटनपटूंनी ऑलिम्पिकसह विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळवली.गोपीचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान केले. १९९९ मध्ये अर्जुन पुरस्कार, २००१ मध्ये राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार (आताचा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार), २००५ मध्ये पद्मश्री, २००९ मध्ये द्रोणाचार्य पुरस्कार आणि २०१४ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या प्रशिक्षक जीवनगौरव पुरस्कारातही त्यांना विशेष सन्मान मिळाला.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

जग 5G च्या पुढे, कुंभारवाडीला अखेर 4G चा दिलासा



आ. सत्यजीत तांबे यांच्या पाठपुराव्याला यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जग 5G तंत्रज्ञानाच्या पुढे जाऊन सॅटेलाइट इंटरनेटच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. एलॉन मस्क यांच्या स्टारलिंकसारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हजारो किलोमीटर उंचीवरील उपग्रहांद्वारे इंटरनेट सेवा उपलब्ध होत असताना, दुसरीकडे संगमनेर तालुक्यातील कुंभारवाडी गावातील नागरिकांना मात्र साध्या मोबाईल नेटवर्कसाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत होती. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही नेटवर्कच्या अभावामुळे डिजिटल सुविधांपासून दूर राहावे लागणाऱ्या या गावाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. केंद्र सरकारच्या 'डिजिटल भारत निधी'अंतर्गत कुंभारवाडी येथील 4G मोबाईल नेटवर्क प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. आमदार सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गावकऱ्यांची अनेक वर्षांची प्रतीक्षा संपण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कुंभारवाडी गावात मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे ग्रामस्थांना अनेक दैनंदिन अडचणींचा सामना करावा लागत होता. विद्यार्थ्यांना ऑनलाइन वर्ग, अभ्यासाचे साहित्य आणि शैक्षणिक माहिती मिळवण्यासाठी नेटवर्क असलेल्या ठिकाणी जावे लागत होते. शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी, ऑनलाइन अर्ज आणि विविध शासकीय कामांसाठी मोबाईल नेटवर्क शोधत भटकावे लागत होते. महिलांनाही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीसह विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येत होत्या.

अनेकदा ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रे पाठवणे, ओटीपी मिळवणे आणि नातेवाइकांशी संपर्क साधणेही कठीण होत होते. एकूणच, डिजिटल भारताच्या प्रवाहात सहभागी होण्याची इच्छा असूनही केवळ नेटवर्क नसल्यामुळे गावकऱ्यांना अनेक सुविधांपासून वंचित राहावे लागत होते. गावभेटीदरम्यान ग्रामस्थांनी ही समस्या आमदार सत्यजीत तांबे यांच्यासमोर मांडली होती. नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन त्यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे पत्रव्यवहार केला आणि कुंभारवाडीला मोबाईल नेटवर्क सुविधा मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या प्रयत्नांना यश आले असून, डिजिटल भारत निधीच्या 4G प्रकल्पात कुंभारवाडीचा समावेश करण्यात आला आहे.

या प्रकल्पामुळे गावात मोबाईल नेटवर्क सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नेटवर्क सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना शेतीविषयक ऑनलाइन कामांसाठी, महिलांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि ग्रामस्थांना दैनंदिन संपर्कासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. गावातील डिजिटल सुविधांना यामुळे नवी गती मिळणार आहे.

दरम्यान, संगमनेर तालुक्यातील पोखरी बाळेश्वर, वनकुटे, पिंपळगाव माथा, भोजदरी, धुमाळवाडी आणि डोळासणे या गावांमध्येही मोबाईल नेटवर्क सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांचा पाठपुरावा सुरू आहे.

५० लाख शेतकरी अग्रीम मदतीपासून वंचित

किसान सभा पुन्हा आंदोलनाच्या तयारीत!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपये अग्रीम मदत दिवाळीपूर्वी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला आणि किसान सभेला दिले होते. मात्र दिवाळी उलटून अनेक दिवस झाले तरी महाराष्ट्रातील तब्बल ५० लाख शेतकरी, म्हणजेच एकूण शेतकऱ्यांपैकी सुमारे ३३ टक्के शेतकरी या अग्रीम मदतीपासून वंचित आहेत. मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात उतरलेले नाही. शेतकऱ्यांची नावे अग्रीमच्या लाभार्थी यादीत नसणे, सामायिक क्षेत्रातील बाधित शेतकऱ्यांचे संमतीपत्र उपलब्ध नसणे, मृत शेतकऱ्यांच्या वारसांकडे ग्रीस्टॅक ओळख क्रमांक नसणे अशा तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे लाखो शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांपेक्षा अधिक मदत शेतकऱ्यांना द्यावी, ही किसान सभेची मागणी आहे. मात्र अंतिम दुष्काळी मदत किती देणार, कोणत्या स्वरूपात देणार आणि ती कधी मिळणार, याबाबत सरकारने अद्याप स्पष्ट घोषणा केलेली नाही.

दुसऱ्या बाजूला नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे तीन हसे थकवण्यात आले आहेत. लाडकी बहीण योजनेतील ८१ लाख महिलांचे मानधन बंद करण्यात आले आहे. नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना किमान दोन लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्यावे, ही किसान सभेची मागणी आहे. मात्र या शेतकऱ्यांच्या पदरात सरकारने अद्याप छदामही टाकलेला नाही. नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात आपण कर्ज भरले म्हणजे पाप केले का, असा संतप्त सवाल निर्माण झाला आहे.

किसान सभा सातत्याने आंदोलने करते, अशी भावना सरकारकडून व्यक्त केली जाते. मात्र सरकारनेच जाहीर केलेल्या योजना आणि मुख्यमंत्र्यांनी दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरवली जाणार नसतील, तर किसान सभा आणि शेतकऱ्यांसमोर आंदोलनाशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरत नाही. शेतकऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरू नये, अशी सरकारची अपेक्षा असेल तर सरकारने आधी आपल्या घोषणांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

किसान सभेने या सर्व प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नुकताच अकोले ते मुंबई असा भव्य वाहन मोर्चा काढला. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय आणि आश्वासने दिली. मात्र मुख्यमंत्र्यांनी स्वतः मान्य केलेल्या मागण्यांची आणि जाहीर केलेल्या योजनांचीही अंमलबजावणी होणार नसेल तर या चर्चांना आणि आश्वासनांना अर्थ काय?

दुष्काळ, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळणारे अपुरे भाव आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी आधीच गंभीर संकटात आहे. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांना पुन्हा आंदोलन करण्यास भाग पाडू नये. अग्रीम मदत, अंतिम दुष्काळी मदत, नमो शेतकरी योजनेचे थकीत हसे, लाडकी बहीण योजनेतील वंचित महिलांचे मानधन आणि नियमित कर्जदारांचे प्रोत्साहन अनुदान या सर्व प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी, असे आवाहन व इशारा किसान सभेच्या वतीने डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, डॉ. अजित नवले, यशवंत झाडे, उमेश देशमुख, सदाशिव साबळे यांनी दिला.

रेशन दुकानात दिव्यांग बांधवांना लाईनमध्ये उभे न करता प्राधान्य द्या - आ. अमोल खताळ



दिव्यांगांचे मानधन वाढवून दिव्यांग भवन तातडीने सुरू करा!

राज्य सरकारच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दिव्यांग बांधवांना सध्या मिळणारी अडीच हजार रुपयांची रक्कम प्रति महिना सहा हजार रुपये करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली. दिव्यांग बांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती, आवश्यक सुविधा आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे यासाठी दिव्यांग भवन तातडीने सुरू करण्यात यावे अशी मागणीही संघटनेच्या वतीने करण्यात आली.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील दिव्यांग बांधवांना स्वस्त धान्य दुकानातून रेशन घेताना रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना रेशन वितरणाच्या वेळी प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार खताळ पाटील यांनी पुरवठा अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत संगमनेर तालुक्यातील सर्वच स्वस्त धान्य दुकानांबाहेर दिव्यांगांना रेशन घेताना प्राधान्य देण्याबाबतचे फलक लावण्याच्या सक्त सूचना दिल्या.

दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन घेताना दुकानां मध्ये रांगेत उभे राहावे लागल्याने त्यांना शारीरिक त्रास सहन करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी दिव्यांगांना रेशन वितरणात प्राधान्य मिळावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीवर तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने आमदारांनी पुरवठा अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानाबाहेर दिव्यांगांना रेशन वितरणात प्राधान्य दिले जाईल, असे स्पष्ट करणारे फलक लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.आमदार खताळ पाटील यांनी दिव्यांग बांधवांच्या समस्येची तात्काळ दखल घेतल्याने दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच दिव्यांग बांधवांनी त्यांच्या तत्परतेचे स्वागत केले आहे.

महिलेला जीवे मारण्याची धमकी, आठ जणांविरुद्ध गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

रस्त्याने ये-जा करण्याच्या वादातून एका महिलेला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत तिच्या गळ्यातील सोन्याचे गंठण ओढून फेकून दिल्याची घटना तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे घडली. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलिसांनी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, धांदरफळ बुद्रुक येथील दीपिका कमलेश डेरे या उपचारासाठी संगमनेर येथे जात असताना दिलीप रामनाथ देशमाने याच्या शेताजवळील रस्त्याने जात होत्या. त्यावेळी दिलीप याने, 'तुम्ही आमच्या रस्त्याने जायचे नाही,' असे म्हणत त्यांना अडवले. या ठिकाणाहून ये-जा करण्यासाठी रस्ता असल्याचे दीपिका यांनी सांगितल्याने दिलीप याने त्यांना शिवीगाळ केली. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या बाळासाहेब भास्कर देशमाने, नवनाथ भास्कर देशमाने, मोहन रमेश देशमाने, सागर विठ्ठल देशमाने, अमोल बबन देशमाने, बबन देशमाने आणि विठ्ठल देशमाने यांनीही त्यांना शिवीगाळ केली. तसेच बाळासाहेब आणि नवनाथ यांनी 'या रस्त्याने गेलात तर कापून टाकू,' अशी धमकी दिली. याचवेळी त्यांनी दीपिका यांच्या गळ्यातील साडेचार तोळ्यांचे सोन्याचे गंठण ओढून फेकून दिले. त्यामुळे हे गंठण गहाळ झाले. या प्रकरणी दीपिका डेरे यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून दिलीप रामनाथ देशमाने, बाळासाहेब भास्कर देशमाने, नवनाथ भास्कर देशमाने, मोहन रमेश देशमाने, सागर विठ्ठल देशमाने, अमोल बबन देशमाने, बबन देशमाने आणि विठ्ठल देशमाने (सर्व रा. धांदरफळ बुद्रुक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

दरम्यान दीपिका यांचा भाऊ प्रणित दीपक बोरखे हा बहिणीला डॉक्टरांकडे घेऊन जाण्यासाठी तेथे आला असता, त्याच्यासमोरही आरोपींनी 'तुला कापून तुझे मटन करून खाऊ,' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यावेळी आरोपींनी सुनंदा दिलीप डेरे यांनाही ढकलून देत शिवीगाळ करण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार)
डॉ. नितीन जठार
एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. कन्सल्टंट फिजिशियन
तज्ज्ञ : खालीचे हृदय रोग टी.बी. व दम्याचे विकार
डॉ.सौ. उज्ज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. कन्सल्टंट पेडियाट्रिशियन
तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इमेर्जन्सी अर
अत्याधुनिक कॅथलॅब
(Cath Lab)
शुभ दिपावली
दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

ठुरशन
ऐश्वस्टाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग
डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अॅम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25